# प्रेस नोट

## दरोड्या गुन्ह्यातील नऊ महिन्यांपासून फरारी असलेल्या आरोपीस खंडणी विरोधी पथकाकडून अटक

पुणे महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर शांतता व सुव्यवस्थता अबाधीत राहणेकरीता शरिराविरूध्दचे गुन्हे करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असताना खंडणी विरोधी पथकाचे पोलीस नाईक धीरज भोर यांना बिबवेवाडी पोलीस स्टेशन यांचेकडील दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपी नामे अल्ताफ उर्फ बचक्या इक्बाल पठाण वय २८ रा. ताडीवाला रोड पुणे हा पुणे स्टेशन परिसरात आला असल्याची बातमी मिळाल्याने खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लक्ष्मण बोराटे यांचे मार्गदर्शना प्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक सुनील गवळी व स्टाफने सदर आरोपीस शिताफीने पकडून त्याचेकडे चौकशी करुन त्यास पुढील कार्यवाहीकरीता बिबवेवाडी पोलीसांच्या ताब्यात दिले आहे. नमुद आरोपी हा अट्टल गुन्हेगार असून त्याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने गुन्ह्यातील व्यापारी फिर्यादी हे बालाजीनगर, धनकवडी भागातून जात असताना मोटर सायकलवरुन पाठलाग करुन फिर्यादीने गळ्यात अडकवलेली कि.रु. ३ लाख रोख असलेली बॅग हिसका मारुन जबरदस्तीने मारहाण करुन लुटली होती, या गुन्ह्यात तो सुमारे ०९ महिन्यांपासून फरारी होता. सदर आरोपीविरूध्द बिबवेवाडी, बंडगार्डन, पुणे रेल्वे पोलीस स्टेशन येथे जबरी चोरी, दरोड्याचे ११ गुन्हे दाखल आहेत.

**वरील कारवाई ही प्रभारी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री. पी.आर.पाटील व सहा. पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री. सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. लक्ष्मण बोराटे, सहा पोलीस निरीक्षक सुनील गवळी व पोलीस स्टाफ धीरज भोर, किरण चोरगे, फिरोज बागवान, मंगेश पवार यांनी केलेली आहे.**